नियमित दिवाणी दावा क्र. २३/२०२५
दिपक वि. शिवदास
नि. क्र.२६ खाली

**वादीतर्फे वकील श्री सुधांशू रोतकर यांच्या मार्फत शपथेवर सुरू**

७. माझे शपथपत्रातील मजकुर हा माझे सांगण्याप्रमाणे लिहलेला असुन तो मी वाचुन त्यावर सही केली आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो **नि. क्र. २६** वर आहे.

८. आता मला खालील कागदपत्रे दाखविण्यात आले त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यास अनुक्रमे निशाणी क्रमांक देण्यात येते.

| अ.क्र | कागदपत्रांचा तपशील | दिनांक | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १ | रॅशन कार्ड कल्पना नाईक | ०५.११.२०१८ | **२८** |
| २ | प्रमाण पत्र तुलसीदास मोहन | ०७.०५.२०१२ | **२९** |
| ३ | प्रमाण पत्र मोहन किसन | ०९.०७.२०१० | **३०** |
| ४ | आधार कार्ड तुलसीदास मोहन | – | **३१** |
| ५ | आधार कार्ड दिपक तुलसीदास नाईक | – | **३२** |

**सरतपास पुर्ण**

दिनांक ०१.०४.२०२६

श्रवणोत्तर स्वीकृत/ समक्ष

स्वा/–
(क्यु. आर. सय्यद)
२रे सह दिवाणी न्यायालय,
कोर्ट नं.३ कामठी

**प्रतिवादीतर्फे वकिल श्री कुशवाहा यांच्यामार्फत शपथेवर सुरू**

९. मी बेरोजगार असल्याचे कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की मी बेरोजगार असून लग्न केले व मला मुलगी झाली. तुलसीदास यांना पाच मुले आहेत. त्यांची नावे सोनु, प्रगती, कोमल, अश्वीनी व दिपक असे आहेत. या सर्वांना मी दाव्यात शामील केलेले नाही. तुलसीदास हे हयात आहे.

१०. डब्लू.सी.एल कंपनीने २०१२ साली जमीन एक्वायर केली आहे. मला त्यावेळी काही माहिती नव्हते. मला २०२४ साली माझ्या वडिलांनी कडून माहिती मिळाली. माझ्या वडीलांनी हक्क सोडचे लेख केल्याचे सांगितले व त्या आधारे शिवदास, संजय व राजेश यांना नोकरी लागली. माझ्या वडीलाचे स्वास्थ्य चांगले नाही. माझे वडील ऐकू शकतात व पाहू शकतात चालता फिरता येत नाही. माझ्या वडीलांनी सन २०१२ साली हक्क सोडचे लेख करुन दिले होते. त्यावेळी त्यांचे स्वास्थ्य चांगले होते. हे म्हणणे खरे आहे की माझ्या वडीलांनी हक्क सोडचे लेख च्या विरुद्ध कोणतेही आक्षेप घेतले नव्हते. साक्षदार स्वतःहून सांगतो की त्यांना काही माहिती नव्हते. त्यांना मी दाव्यात साक्षदार म्हणून तपासणार नाही. हे म्हणणे खरे आहे की माझ्या भाऊ बहीणींच्या सोबत नातेसंबंध चांगले नाही. हे म्हणणे खरे आहे की आज दाखल केलेले सर्व कागदपत्र दावा दाखल करण्याअगोदर पासून माझ्या ताब्यात होते. हे म्हणणे खरे नाही की मी खोटा दावा दाखल करुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

दिनांक ०१.०४.२०२६

श्रवणोत्तर स्वीकृत/ समक्ष

स्वा/–
(क्यु. आर. सय्यद)
२रे सह दिवाणी न्यायालय,
कोर्ट नं.३ कामठी